**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नाशिक ग्रामीण **P.S.(ठाणे):** वाडिवा-हे
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0106 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**22/05/2025 07:51

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 21/05/2025
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 21/05/2025
**Time From (वेळेपासून):** 16:57 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 22/05/2025 **Time (वेळ):** 06:58 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 007
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 22/05/2025 06:58 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 12 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** वाडीव-हे ते मोडाळे गावाकडे जाण

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** गणेश भाऊसाहेब पाटील

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | तिडके कॉलनी, नाशिक,भाग्यश्री बंगलो, प्लॉट नंबर 2,वाडिवा-हे,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | तिडके कॉलनी, नाशिक,भाग्यश्री बंगलो, प्लॉट नंबर 2,वाडिवा-हे,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8275016018

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सौ. योगिता धुराजी कचकुरे | | | 1. प्लॉट नंबर 3, सोमेशवर कॉलनी,,वाडिवा-हे,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री. दत्तात्रय मनोहर टिळे मं | | | 1. 625, टिळक पथ, भगुर, ताजिनाशि,वाडिवा-हे,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रूपये दराच्या 20 चलनी नोटा | 10,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

10,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

। गु.र.नं 106/2025 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988चे कलम 7 प्रमाणे
फिर्यादी - गणेश भाऊसाहेब पाटील, वय:- 39 वर्षे, व्यवसाय - वकीली, राहणार:- भाग्यश्री बंगलो, प्लॉट नंबर 2, तिडके कॉलनी, नाशिक मोबाईल क्रमांक 8275016018
आरोपी – 1)सौ. योगिता धुराजी कचकुरे, वय- 42 वर्षे, तलाठी सजा- मोडाळे, ता. इगतपुरी, जि. नाशिक, राहणार:- प्लॉट नंबर 3, सोमेश्वर कॉलनी, एबीबी कंपनीजवळ, सातपुर, नाशिक, 2)श्री. दत्तात्रय मनोहर टिळे, मंडळ अधिकारी, वाडिव-हे, ता.ईगतपुरी, जि. नाशिक राहणार- 625, टिळक पथ, भगुर,ता.जि.नाशिक
अप.घ.ता.वेळ.ठिकाण –दिनांक 21/05/2025 रोजी 16/57 वा चे सु॥ वाडीव-हे ते मोडाळे गावाकडे जाणा-या सार्वजनिक रस्त्यावर भंभाळे फाटा, ता.ईगतपुरी, जि.नाशिक
मिळाला माल – 10,000रु.रोख रक्कम
प्रकार – वरील ता वेळी व ठिकाणी यातील लोकसेवक नामे श्रीमती योगिता कचकुरे, तलाठि सजा मोडाळे, ता. ईगतपुरी, जि.नाशिक यांनी फिर्यादी यांचे आई व वडीलांचे नावे मौजे मोडाळे, ता. इगतपुरी, जि. नाशिक येथील गट क्रमांक 636 मिळकतीच्या गांव नमुना सात यावर इतर अधिकार यामध्ये ‘ मे.न्यायालयाचा अंतिम निकाल लागेपर्यंत त्रयस्थ संबधास प्रतिबंध ’ अशी फेरफार नोंद क्रमांक 1068 अन्वयेची नोंद मा. न्यायालयाकडील आदेशान्वये रद्द होणेकामीची नोंद घेण्याचे मोबदल्यात फिर्यादी यांचेकडे 10,000/- रूपये लाचेची मागणी करून मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारली तसेच सदरील नोंद मंजुर करणारे श्री. दत्तात्रय मनोहर टिळे, मंडळ अधिकारी, वाडिव-हे, ता.ईगतपुरी, जि. नाशिक राहणार- 625, टिळक पथ, भगुर,ता.जि.नाशिक यांनी सदरील नोंद मंजुर करण्याचे मोबदल्यात फिर्यादी यांचेकडे 5000/- रूपये लाचेची मागणी केली म्हणुन गुन्हा.
दाखल अंमलदार – पो हवा 2164धारणकर मोनं 9420251287
तपाशी अंमलदार – पोनिरी संदीप बबन घुगे मोनं 8605111234 फिर्याद दिनांक – 22/05/2025
माझे नांव गणेश भाऊसाहेब पाटील, वय:- 39 वर्षे, व्यवसाय - वकीली, राहणार:- भाग्यश्री बंगलो, प्लॉट नंबर 2, तिडके कॉलनी, नाशिक मोबाईल क्रमांक 8275016018समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी जिल्हा न्यायालय, नाशिक येथे वकीली व्यवसाय करुन माझ्या कुंटुबियाची उपजिवीका भागवितो. माझे वडील नामे श्री. भाऊसाहेब कारभारी पाटील हे सुध्दा वकीली व्यवसाय करतात. माझी आई व वडीलांचे नावे मौजे मोडाळे, ता. इगतपुरी, जि. नाशिक येथे गट क्रमांक 636 मिळकत असुन सदर मिळकतीच्या गांव नमुना सात ( अधिकार अभिलेख पत्रक ) यावर इतर अधिकार यामध्ये ‘ मे.न्यायालयाचा अंतिम निकाल लागेपर्यंत त्रयस्थ संबधास प्रतिबंध ’ अशी फेरफार नोंद क्रमांक 1068 अन्वये नोंद आहे. सदर बाबत मा. 5 वे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नाशिक यांच्याकडे Special civil suit No.412/2012 Stands dismissed for want of prosecution. Proceeding stands closed. असे आदेश झाले होते. त्यावरून माझे वडिल यांनी तहसिलदार, ईगतपुरी, नाशिक तसेच सदरील गांवच्या तलाठि नामे योगिता कचकुरे यांच्या कार्यालयात अर्ज केला आहे. सदर अर्जावर कार्यवाही करून मा. न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयानुसार सदरील नोंद रद्द होणेकामी नोंद घेण्याचे काम झाले अगर कसे ? याची चौकशी करण्यासाठी मी माझा सहकारी वकिल नामे लक्ष्मण गोहिरे, रा. रायगडनगर, नाशिक

यांना दिनांक 08/05/2025 व दिनांक 16/05/2025 रोजी तलाठि नामे योगिता कचकुरे यांची भेट घेण्यासाठी पाठविले असता त्यांनी मे. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे गट क्रमांक 636 मिळकतीच्या गांव नमुना सात ( अधिकार अभिलेख पत्रक ) यावर इतर अधिकार यामध्ये ' मे.न्यायालयाचा अंतिम निकाल लागेपर्यंत त्रयस्थ संबधास प्रतिबंध ' अशी नोंद रद्द होणेकामी नोंद घेण्याचे मोबदल्यात 10 हजार रूपयांची मागणी केली व सदरील नोंद मंजुर करणारे मंडळ अधिकारी दत्तात्रय टिळे यांना देखिल पैसे दयावे लागतील नाहीतर ते नोंद मंजुर करणार नाही, रद्द करतील असे सांगितले. त्यावर माझा सहकारी वकिल लक्ष्मण गोहिरे यांनी मंडळ अधिकारी दत्तात्रय टिळे यांना फोनवर संपर्क केला असता त्यांनी मला भेटण्यास बोलाविले आहे. सदरबाबत श्री. लक्ष्मण गोहिरे यांनी मला नाशिक येथे येऊन घडलेला प्रकार सांगितला. माझे आई वडिल यांच्या नावे असलेल्या गट क्रमांक 636 मिळकतीच्या गांव नमुना सात यावर इतर अधिकार यामध्ये मे.न्यायालयाचा अंतिम निकाल लागेपर्यंत त्रयस्थ संबधास प्रतिबंध अशी नोंद रद्द होणेकामी नोंद घेणे हे काम कायदेशिर असुन त्यासाठि लागणा-या सर्व कायदेशीर बाबीची पुर्तता आम्ही केली असुन त्यासाठि कोणतीही शासकिय फि भरण्याची आवश्यकता नाही. तरी देखील तलाठी नामे श्रीमती योगिता धुराजी कचकुरे विविध कारणे सांगुन मी त्यांना लाच म्हणुन 10 हजार रूपये देत नसल्याने माझे काम करण्यास दिरंगाई करीत आहे. परंतु माझे काम कायदेशीर असुन मी तलाठी नामे श्रीमती योगिता धुराजी कचकुरे व मंडळ अधिकारी नामे श्री. दत्तात्रय टिळे यांना कोणतीही रक्कम देणे लागत नसुन माझ्यात आणि त्यांच्यात कोणत्याही प्रकारचा आर्थिक व्यवहार नाही तसेच वैर नाही. मी त्यांना लाच दिली नाही तर ते माझे आई वडिल यांच्या नावे असलेल्या मिळकती मधील फेरफार नोंद क्रमांक 1068 कमी करणार नाहीत. मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसुन सदरबाबत पडताळणी करून त्यांचेवर कायदेशिर कारवाई करणेसाठी मी दिनांक 20/02/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कडील पोलीस निरीक्षक संदिप घुगे यांचेकडे वरील हकीगतीची लेखी तक्रार दिली होती. मी दिलेल्या तक्रारीचे अनुशंगाने श्री. संदीप घुगे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक यांनी दिनांक 20/02/2025 रोजी तलाठी नामे श्रीमती योगिता धुराजी कचकुरे तसेच श्री. दत्तात्रय टिळे, मंडळ अधिकारी हे खरोखरच माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे ? याची पडताळणी करणेकामी मला व पंच क्रमांक 1 श्री. प्रसाद साळवे यांना माझेकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवून माझे कडील फोर व्हिलर कारने मंडळ अधिकारी कार्यालय, वाडीव-हे, ता. इगतपुरी, जि. नाशिक येथे पाठविले असता तेथे माझी व लोकसेवक नामे दत्तात्रय टिळे, मंडळ अधिकारी यांची भेट झाली. त्यावेळी माझे व मंडळ अधिकारी दत्तात्रय टिळे यांचे आमच्या मौजे मोडाळे, ता. इगतपुरी, जि. नाशिक येथील गट क्रमांक व उपविभाग 636 क्षेत्र 0.60 आर या जमिनीच्या गाव नमुना सात (अधिकार अभिलेख पत्रक) उता-यावरुन फेरफार नोंद क्रमांक 1068 कमी करण्याची नोंद मंजुर करण्याचे कामकाजाबाबत संभाषण झाले. त्यावेळी लोकसेवक नामे दत्तात्रय टिळे, मंडळ अधिकारी यांनी माझे नमुद प्रलंबित काम करण्याचे आश्वासन देवून मला '' तुमच्या पध्दतीनं करून टाकाना वकिल साहेब, तुमचं नेहमीचेच काम रहाता ना '' असे म्हणुन मला योग्य वाटेल ती रक्कम लाच म्हणुन देण्यास सांगितले त्यावर मी त्यांना '' नाही सर काहीच अडचण नाही '' असे म्हणुन किती रक्कम लाच म्हणुन मागतात याची खात्री केली असता त्यांनी '' तुमचं स्वतःच काम ना, मी काय बोलु स्वतः, काम दुस-याचं राहिलं असत ना मी सांगितल असत वकिल साहेब एवढं सांगुन दया '' असे म्हणुन त्यांनी माझे नमुद कामकाज करून देण्यासाठी लाच दयावी लागेल परंतु त्यांनी लाचेची रक्कम किती दयावी लागेल बाबत निश्चित सांगितले नसल्याने मी लोकसेवक नामे दत्तात्रय टिळे यांना '' मी थोडाफार करणार, परत तुम्ही म्हणणार हे माझे पध्दतीने नाही झाल असं, तुमची पोस्ट सध्या मॅडम पेक्षा अप्पर म्हणुन म्हटलं '' असे बोलुन निश्चित लाचेची रक्कम किती दयावी लागेल बाबत विचारणा केली. त्यावेळी लोकसेवक नामे दत्तात्रय टिळे यांनी त्यांचेकडील मोबाईल फोन मधील कॅल्क्युलेटर वर 5 आकडा टाकुन '' माझं एवढं करुन टाका, मॅडमला नोंद टाकायला लावा मी करून देतो, मी सांगतो मॅडमला नोंद टाकायला '' असे म्हणाले. लोकसेवक नामे दत्तात्रय टिळे यांनी त्यांचेकडील मोबाईल फोन मधील कॅल्क्युलेटर वर 5 आकडा टाकला असल्याने '' हे पाच म्हणजे ? किती पण पाच ? '' असे मी त्यांना बोलुन पाच म्हणजे किती लाचेची रक्कम याबाबत विचारणा केली. त्यावेळी लोकसेवक नामे दत्तात्रय टिळे यांनी '' हमं '' असे बोलुन लाचेच्या रक्कमेबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यावेळी मी त्यांना '' पाच हजार '' असे बोलुन पाच म्हणजे पाच हजार रूपये लाचेची रक्कम दयावी लागेल का बाबत विचारणा केली असता लोकसेवक नामे दत्तात्रय टिळे यांनी त्यांची मान होकारार्थी हालवुन '' हमं '' असे बोलुन माझ्याकडे पाच हजार रूपये लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना '' ठिकये चालल '' असे म्हणालो असता लोकसेवक नामे दत्तात्रय टिळे यांनी मला '' मॅडमला काय असेल ते देऊन टाका, नोंद टाकायला लावा '' असे बोलुन सजा- मोडाळे येथील तलाठी नामे श्रीमती योगिता कचकुरे यांना आमच्या मौजे मोडाळे, ता. इगतपुरी, जि. नाशिक येथील गट क्रमांक व उपविभाग 636 क्षेत्र 0.60 आर या जमिनीच्या गाव नमुना सात (अधिकार अभिलेख पत्रक) उता-यावरुन फेरफार नोंद क्रमांक 1068 कमी करण्याची नोंद टाकायला सांगण्याचे मोबदल्यात तसेच सदरील नोंद मंजुर

करण्यासाठी त्यांना देखील लाच दयावी लागेल असे सांगितले. त्यानंतर मी सदर ठिकाणाहुन निघुन सापळा पथक थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो व त्यांना घडलेली हकिगत सांगुन तलाठि नामे योगिता कचकुरे हया रजेवर असल्याचे सांगितले. त्याबाबत त्यांनी सविस्तर पंचनामा केला व माझे प्रलंबित असलेले काम तलाठि नामे योगिता कचकुरे यांचेकडे असल्याने पुढिल पडताळणी दिनांक 21/05/2025 रोजी करण्याचे ठरविले. दिनांक 21/05/2025 रोजी ठरल्याप्रमाणे तलाठी नामे श्रीमती योगिता धुराजी कचकुरे हया आमचे प्रलंबित काम करून देण्याचे मोबदल्यात खरोखरच माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे ? याची पडताळणी करणेकामी मला व पंच क्रमांक 1 श्री. प्रसाद साळवे यांना माझेकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवून माझे कडील दुचाकीने सजा मोडाळे कार्यालय, ता. इगतपुरी, जि. नाशिक येथे पाठविले. त्यावरून मी व पंच क्रमांक 1 श्री. प्रसाद साळवे असे गेलो असता माझी तलाठि नामे श्रीमती योगिता धुराजी कचकुरे यांचेशी भेट झाली त्यावेळी त्यांनी मला '' काल परवा पण म्हटलं भाऊसाहेब त्यांची नोंद, नाही नाही म्हणे टाकु नका म्हणे गोहिरे ला माझेकडे पाठवुन दया'' असे मंडळ अधिकारी श्री. टिळे म्हणाल्याचे सांगितले त्यावर त्यांना मी काल जाऊन मंडळ अधिकारी दत्तात्रय टिळे यांना भेटल्याचे सांगितले असता त्यांनी मला मग काय म्हणाले असे विचारले असता त्यांना मी '' त्यांच म्हणंण असं ये, त्यांचा तर विषय झाला आता,ते बोलले काल, असं असं करायचं, मग तुमचं काय मला सांगा ना मॅडम '' असे म्हणालो असता त्यांनी '' बघा तुमच्या हिशोबानी '' असे सांगितले त्यावर त्यांना मी '' नाही सांगा ना, मोकळं सांगा मॅडम, कसय काय आहे मला त्या गोष्टीसाठी परत यायला ना '' असे म्हणालो असता त्यांनी कामाबाबत संभाषण करून '' पर्सनल काम आहे म्हणुन नाहीतर तिस-याचं असतं मी पण तुम्हाला हे सांगितलं असतं तुमच्या हिशोबाने करा '' असे सागितले. त्यावर मी त्यांना '' अहो नाही, नाही सांगा मॅडम काही अडचण नाही '' असे म्हणालो असता तलाठि नामे श्रीमती योगिता धुराजी कचकुरे यांनी '' दहा करा मग '' असे म्हणुन दहा हजार रूपये लाचेची मागणी केली. ती मी '' दहा ठिक आहे चालेल, पण मला फास्ट करून दया '' असे म्हणुन इतर संभाषण करून त्याठिकाणहुन निघालो व सापळा पथक थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो व त्यांना घडलेली हकिगत सांगुन तलाठि नामे योगिता कचकुरे यांनी माझे प्रलंबित काम करून देण्याच्या मोबदल्यात माझेकडे 10,000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे सांगुन ते माझे प्रलंबित काम एक तासात करून देणार असल्याचे सांगितले. त्यानंतर मी लोकसेवक नामे श्रीमती योगिता धुराजी कचकुरे, तलाठि सजा- मोडाळे यांना लाच म्हणुन देणेकामी हजर केलेल्या लाचेच्या 500/- रूपये दराच्या 20 चलनी नोटाना अँन्थ्रासीन पावडर लावुन लोकसेवक नामे श्रीमती योगिता धुराजी कचकुरे यांनी माझ्याकडे लाचेची रक्कम मागितल्यास त्यांना देणेकामी माझ्याकडे दिले व लोकसेवक नामे श्रीमती योगिता धुराजी कचकुरे यांची भेट झाल्यानंतर त्यांनी मागणी केल्यावर अँन्थ्रासीन पावडर लावलेल्या 500/- रूपये दराच्या 20 चलनी नोटा देण्यास सांगितले व लोकसेवक नामे श्रीमती योगिता धुराजी कचकुरे यांनी लाच स्विकारल्यास पडताळणी व सापळापुर्व पंचनाम्यात ठरल्याप्रमाणे पुर्वनियोजित इशारा करणे बाबत सांगितले. सदर बाबत पोलीस निरीक्षक संदीप घुगे व त्यांच्या सोबत असलेल्या सापळा पथकाने सविस्तर लाच मागणी पडताळणी व सापळापुर्व पंचनामा केला आहे. त्यानंतर माझ्यात व लोकसेवक नामे लोकसेवक नामे श्रीमती योगिता धुराजी कचकुरे यांच्यात फोनव्दारे झालेल्या संपर्कानुसार त्यांची व माझी भेट तलाठि कार्यालय सजा मोडाळे याठिकाणी होणार असल्याने पोलीस निरीक्षक संदीप घुगे यांनी माझेकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करुन देवुन मला, पंच क्रमांक 1 श्री. प्रसाद साळवे यांचेसह मोडाळे गांवातील तलाठि कार्यालय याठिकाणी रवाना केले व माझे मागोमाग पोलीस निरीक्षक श्री. घुगे व सापळा पथक निघाले. त्यावेळी लोकसेवक नामे श्रीमती योगिता धुराजी कचकुरे हया मोडाळे तलाठि कार्यालयाच्या समोरील सार्वजनिक रस्त्यावर उभ्या होत्या त्यांचे बाजुस एक महिला दुचाकी स्वार होत्या तेथे पोहचताच त्यांनी मला त्यांचे मागोमाग भंभाळे फाटा येथे येण्यास सांगितले असता मी लोकसेवक नामे श्रीमती योगिता धुराजी कचकुरे यांचे पाठोपाठ माझेकडील दुचाकी वर पंच क्रमांक 01 सह निघालो असता माझ्या मागोमाग सापळा पथक देखिल आले व भंभाळे फाटा याठिकाणी लोकसेवक नामे श्रीमती योगिता धुराजी कचकुरे हया दुचाकीवरून उतरून एकटया उभ्या असताना माझी आणि त्यांची भेट झाली त्यावेळी त्यांचेत व माझ्यात माझ्या आई वडीलांच्या नावे असलेल्या मौजे मोडाळे येथील गट क्रमांक 636 मिळकतीच्या गांव नमुना सात यावर इतर अधिकार यामध्ये मे.न्यायालयाचा अंतिम निकाल लागेपर्यंत त्रयस्थ संबधास प्रतिबंध अशी नोंद रद्द होणेकामी त्यांनी नोंद केल्याबाबत संभाषण झाले त्यावेळी मी त्यांना '' नोटीस ओ मॅडम '' असे विचारले असता त्यांनी '' त्याला गरज नाही नोटीसची, कारण आदेशाची नोंद '' असे सांगितले. त्यावर माझे व त्यांचे आदेशाविषयी बोलणे झाले. त्यानंतर मी लोकसेवक नामे श्रीमती योगिता कचकुरे यांना '' नोंद पडुन जाईल म्हणजे सगळयान साठी कॉमन '' अशी विचारणा केली असता त्यांनी ''सगळयांसाठी उता-यावरचा शेरा दिला ना तो समजा '' असे सांगितले. त्यानंतर आमचे नोंदी विषयी बोलणे झाल्यावर '' नही आता तुम्हीच करुन दया ना मॅडम, तुम्ही आता बाय हॅन्ड देऊन टाका '' असे सांगितले असता त्यांनी मला '' ते करतील ना यावर सही '' असे बोलुन मंडळ अधिकारी

दत्तात्रय टिळे हे त्यावर सही करतील का बाबत विचारणा केली असता मी त्यांना ''हो शंभर टक्के त्याच झालय बोलण तर'' असे सांगुन लाचेची रक्कम हातात धरून '' हे तुमच्या म्हणण्याप्रमाणे एवढे '' असे लोकसेवक नामे श्रीमती योगिता कचकुरे यांना म्हणालो असता त्यांनी '' बापरे रोडवर असे '' असे म्हणाले. त्यावर मी त्यांना '' नाही, नाही मित्र माझा '' असे पंच क्रमांक 1 श्री. प्रसाद साळवे यांचेकडे पाहुन त्यांना '' म साईटला या '' असे बोलुन रस्त्याचे बाजुला या असे सांगितले असता त्यांनी मला '' पेपर वगैरे मध्ये दयायचे ना '' असे बोलुन लाचेची रक्कम ही पेपर मध्ये गुंडाळुन दयायची ना असे सांगितले. त्यावर मी त्यांना '' हं तुम्ही म्हटले त्याप्रमाणे दहा हजार रुपये, हं तुमच्या म्हणण्यानुसार हे घ्या '' असे बोललो असता त्यांनी त्यांच्या हातातील पिशवी माझ्या समोर धरून उघडली व माझ्या हातातील लाचेची रक्कम त्यांचेकडील कागदपत्रांच्या पिशवीत ठेवण्यास खुणविले असता मी माझ्या उजव्या हातातील अँन्थ्रासीन पावडर लावलेल्या 500/- रूपये दराच्या 20 चलनी नोटा लोकसेवक नामे श्रीमती योगिता कचकुरे यांचेकडील पिवळसर सफेद रंगाच्या पिशवीत ठेवुन दिल्या त्या त्यांनी वाडीव-हे ते मोडाळे गावाकडे जाणा-या सार्वजनिक रस्त्यावर भंभाळे फाटा, ता.ईगतपुरी, जि.नाशिक येथे दिनांक 21/05/2025 रोजी 16/57 वाजता स्विकारल्या. त्यानंतर मी लागलीच लाच स्विकारले बाबत पुर्वनियोजित इशारा केला. त्यानंतर सदर ठिकाणी पोलीस निरीक्षक संदीप घुगे व सापळा पथकातील सदस्य आले त्यांनी लोकसेवक नामे श्रीमती योगिता धुराजी कुचकुरे यांना सदर ठिकाणी त्यांची ओळख देवुन त्याचे नांव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नांव सौ. योगिता धुराजी कचकुरे, वय- 42 वर्षे, तलाठी सजा- मोडाळे, ता. इगतपुरी, जि. नाशिक, राहणारः- प्लॉट नंबर 3, सोमेशवर कॉलनी, एबीबी कंपनीजवळ, सातपुर, नाशिक असे सांगितले. सदर बाबत यशस्वी लाचेचा सापळा कारवाईचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.तरी लोकसेवक नामे श्रीमती योगिता कचकुरे, तलाठि सजा मोडाळे, ता. ईगतपुरी, जि.नाशिक यांनी माझी आई व वडीलांचे नावे मौजे मोडाळे, ता. इगतपुरी, जि. नाशिक येथील गट क्रमांक 636 मिळकतीच्या गांव नमुना सात यावर इतर अधिकार यामध्ये ' मे.न्यायालयाचा अंतिम निकाल लागेपर्यंत त्रयस्थ संबधास प्रतिबंध ' अशी फेरफार नोंद क्रमांक 1068 अन्वयेची नोंद मा. न्यायालयाकडील आदेशान्वये रद्द होणेकामीची नोंद घेण्याचे मोबदल्यात माझेकडे 10,000/- रूपये लाचेची मागणी करून मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारली तसेच सदरील नोंद मंजुर करणारे श्री. दत्तात्रय मनोहर टिळे, मंडळ अधिकारी, वाडिव-हे, ता.ईगतपुरी, जि. नाशिक राहणार- 625, टिळक पथ, भगुर,ता.जि.नाशिक यांनी सदरील नोंद मंजुर करण्याचे मोबदल्यात माझेकडे 5000/- रूपये लाचेची मागणी केली म्हणुन माझी त्यांचेविरूध्द फिर्याद आहे. माझी वरील टंकलिखीत केलेली फिर्याद मी वाचुन पाहिली ती मी सांगीतले प्रमाणे व घडल्या घटनेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष ही फिर्याद दिली
दिनांक 22/05/2025

( गणेश भाऊसाहेब पाटील )

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

hemantkumar sahebrao bhamare (I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

Ganesh

15.**Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची सही)**

**Name (नाव):** hemantkumar sahet
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI